| MHSO070006802022 | नियमित दरखास्त क्र. २८/२०२२ मधील निशाणी क्र. २७ खालील आदेश<br>(पारीत दिनांक ०३ जानेवारी २०२६) |
|---|---|

१. धनको यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीचे खरेदीखत तिच्या नांवे करुन देण्यासाठी नवीन न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करण्यात यावी यासाठी दाखल केला आहे. धनको यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. निशाणी क्र.२६ वरील बेलिफ अहवाल पाहिला. निशाणी क्र.२५ वरील आदेशाप्रमाणे सहाय्यक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, पंढरपूर, श्रीमती शिंदे यांची नेमणुक न्यायालयीन आयुक्त म्हणुन करण्यात आली होती. परंतु, त्यांची प्रतिनियुक्ती जिल्हा कौटुंबिक न्यायालय सोलापूर येथे झालेली असल्या कारणाने सदर व्यक्ती न्यायालयीन आयुक्त म्हणुन काम करण्यास उपलब्ध नाही. सबब, दुस–या व्यक्तीची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज (निशाणी क्र. २७) मंजुर करण्यात येत आहे.

२. सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय पंढरपूर यांची दावा मिळकतीचे हुकुमनाम्याप्रमाणे धनको यांच्या लाभात खरेदीखत करुन देण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येत आहे.

३. सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय पंढरपूर यांनी खरेदीखतावर न्यायालयामार्फत सही करण्यासाठी तसेच दुय्यम निबंधक कार्यालय येथे उपस्थित राहुन दस्त नोंदणी करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करायची आहे.

४. धनको यांनी सदर दस्त नोंदणीचा संपुर्ण खर्च, त्यासाठी लागणारी स्टॅम्प डयुटी, नोंदणी खर्च व इतर सर्व खर्च करायचा आहे.

५. धनको यांनी सहाय्यक अधिक्षक, सह दिवाणी न्यायालय पंढरपूर यांना दस्त नोंदणीचा दिनांक आणि वेळ कमीत कमी सात दिवस आधी कळवावे.

SONALI SHASHIKANT RAUL

Digitally signed by SONALI SHASHIKANT RAUL
Date: 2026.01.03 17:22:54 +0530

(एस.एस.राऊळ)

**दिनांक – ०३.०१.२०२६.**

**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पंढरपूर,**

**जि. सोलापूर.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | D.S.Landage, Stenographer (Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) Pandharpur, Dist. Solapur. |
| Date | :- | 03.01.2026. |
| Order signed by the presiding officer on | :- | 03.01.2026. |
| Order uploaded on | :- | 03.01.2026. |